# प्रेसनोट दिनांक - ०६/०८/२०१९

## डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर

डेक्कन १ मोबाईल वरील कर्मचारी यांचे सतर्क पेट्रोलीग मुळे नागरिकांचे गहाळ झालेले पॉकेट मिळाले परत..

---

दिनांक ०५/०८/२०१९ रोजी श्री. गद्रे, पोहवा ८४९ व श्री मोरे, पोना ६४५८ यांना डेक्कन १ मोबाईलवर दिवसाळी डयुटी असतांना पेट्रोलींग दरम्यान शेलारमामा चौक, कर्वेरोड, डेक्कन येथे जेन्टस् पॉकेट सापडले. सदरचे पॉकेट पोलीस स्टेशन येथे आणुन चेक केले असता त्यामध्ये ८००/- रुपये रोख रक्कम, लायसन्स, ए.टी.एम. कार्ड, आधार कार्ड व इतर कागदपत्र मिळुन आली. कागदपत्रावरील नाव व पत्ता यांची खात्री केली असता श्री आकाश राजेंद्र खैरनार वय २२ वर्षे, रा. नाशिक, सध्या रा. मातोश्री स्कुल जवळ, वारजे माळवाडी, पुणे मोबाईल क्रमांक ८००७०७७४३० याचे असल्याची खात्री झाल्याने सदर क्रमांकवर श्री गद्रे यांनी कॉल करुन त्यांना पोलीस स्टेशन येथे बोलावुन घेवुन पॉकेटची खात्री करुन त्यांना ते परत करण्यात आले. श्री आकाश राजेंद्र खैरनार यांनी आपले पॉकेट परत मिळाल्याने पोलीसांचे आभार मानले.

